# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
## कार्यवृत्तांत

विविध वित्तीय संस्थांकडील वैयक्तिक प्रकल्प अथवा योजना यांच्या अनुषंगाने अभियांत्रिकी विभागाशी संबंधीत केली जाणारी कामे यासंदर्भात डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली दि. १५ डिसेंबर, २०१४ रोजी दुपारी ३.०० वाजता विद्यापीठ कार्यालयामध्ये बैठक आयोजित करण्यात आली. सदर बैठकीस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

१. प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, संख्याशास्त्र अधिविभागप्रमुख. — अध्यक्ष
२. प्रा. डॉ. डी. व्ही. मुळे, कुलसचिव. — सदस्य
३. श्री. व्ही. टी. पाटील, वित्त व लेखा अधिकारी. — सदस्य
४. प्रा. डॉ. सी. डी. लोखंडे, पदार्थविज्ञान अधिविभागप्रमुख. — सदस्य
५. प्रा. डॉ. एम. ए. अनुसे, रसायनशास्त्र अधिविभागप्रमुख. — सदस्य
६. डॉ. जी. एस. कुलकर्णी, उपकुलसचिव, अभियांत्रिकी विभाग. — सदस्य
७. श्री. एस. एम. कुबल, उपकुलसचिव, म. व वि. वि. विभाग. — सदस्य सचिव

सदर बैठकीत खालील प्रमाणे कामकाज करण्यात आले.

**विषय** : विविध वित्तीय संस्थांकडील वैयक्तिक प्रकल्प अथवा योजना यांच्या अनुषंगाने विविध अधिविभागांमार्फत खालीलप्रमाणे विविध कामे केली जातात. या कामांमध्ये अभियांत्रिकी विभागाशी निगडित असलेल्या कामांपैकी,

१. चर खणणे,
२. खड्डे खणणे,
३. सपाटीकरण करणे,
४. विहिर खणणे,
५. सपाटीकरण करुन जमीन तयार करण्यासाठी माती मागविणे,
६. रस्ता तयार करणे,
७. शेड तयार करणे,
८. Green House तयार करणे,
९. Animal House तयार करणे,
१०. Studio/Laboratory तयार करणे,
११. इमारत अथवा कच्चे बांधकाम करणे.

त्याचप्रमाणे अभियांत्रिकी विभागाशी निगडीत असणारी इतर आवश्यक कामे या बाबींचा समावेश होतो. सदर बाबींना प्रशासकीय मान्यता देताना याबाबत अभियांत्रिकी विभागाच्या नियमाप्रमाणे (शासन नियमावली, विद्यापीठ लेखासंहिता) कार्यवाही करण्यास अथवा नियमित कार्यवाही करण्यास मान्यता द्यावी याबाबत कोणतेही आदेश किंवा सुस्पष्टता दिसून येत नाही. त्यामुळे समितीचे गठण करुन त्या समितीने विविध वित्तीय संस्थांकडील वैयक्तिक प्रकल्प अथवा योजना यांच्या अनुषंगाने अभियांत्रिकी विभागाशी संबंधीत केली जाणारी कामे या संदर्भातील नियमावली तयार करुन घेण्यासंदर्भात सदरची बैठक आयोजीत केली होती व त्यानुसार गठित समितीमार्फत खालीलप्रमाणे ठराव करण्यात आले.

**ठराव** : १. अधिविभाग समितीने प्रथम कामाचा प्रकार पाहून त्यातील किती टक्के भाग हा सिव्हील प्रकारचा आहे त्याप्रमाणे म. व वि. वि. विभाग यांकडे सदर कामाच्या मान्यतेसाठी शिफारस करावी.

२. उपरोक्त बाबींसाठी संबंधीत अधिविभागाने अभियांत्रिकी विभागाच्या पॅनेल वरील तंज्ञ अभियंताची नियुक्ती करावी जेणेकरुन उपरोक्त कामाबाबत तसेच इतर आवश्यक कामाबाबत मार्गदर्शन घेऊन पुढील काम करणे त्या विभागास सोपे होईल.

३. संबंधीत प्रस्ताव म. व वि. वि. विभागाकडे प्राप्त झालेनंतर तो अभियांत्रिकी विभागाकडे अभिप्रायासाठी पाठविण्यात यावा व सकारात्मक अभिप्राय प्राप्त झालेस त्यास म. व वि. वि. विभागाकडून मान्यतेसाठी प्रस्ताव पाठविण्यात यावा.

४. सदर कामासंदर्भात येणारा अंदाजे खर्च हा अभियांत्रिकी विभागाने ठरवून दिलेल्या दरांप्रमाणे असावा व यासाठी अभियांत्रिकी विभागाने दरांची यादी सर्व अधिविभागांना तसेच म. व वि. वि. विभागास उपलब्ध करुन द्यावी.

५. Technical Specification, Inspection Reports, Completion Report, General & Final Report या सर्व बाबी नेमणुक केलेले अभियंता यांचेमार्फत म. व वि. वि. विभागास सादर करावा.

६. उपरोक्त संदर्भातील काम पुर्णत्वाकडे आलेनंतर त्याची अभियांत्रिकी विभागाच्या नियुक्त तज्ञ अभियंताने पाहणी करुन त्याचा अहवाल म. व वि. वि. विभागास सादर करणे आवश्यक आहे.

७. संबंधीत काम पुर्ण झाले असता त्याचे Completion Certificate नेमुन दिलेल्या अभियंत्याकडून अभियांत्रिकी विभागामार्फत म. व वि. वि. विभागाकडे पाठविण्यात यावे.

याप्रमाणे संबंधीत कामासंदर्भातील ठराव मंजूर करण्यात आला.

प्रा. डॉ. डी. व्ही. मुळे
कुलसचिव.
सदस्य

श्री. व्ही. टी. पाटील
वित्त व लेखा अधिकारी.
सदस्य

प्रा. डॉ. सी. डी. लोखंडे
पदार्थविज्ञान अधिविभागप्रमुख.
सदस्य

प्रा. डॉ. एम. ए. अनुसे
रसायनशास्त्र अधिविभागप्रमुख.
सदस्य

डॉ. जी. एस. कुलकर्णी
उपकुलसचिव, अभियांत्रिकी विभाग.
सदस्य

श्री. एस. एम. कुबल
उपकुलसचिव, म. व वि. वि. विभाग.
सदस्य सचिव

प्रा. डॉ. डी. टी. शिर्के
संख्याशास्त्र अधिविभागप्रमुख.
अध्यक्ष